# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/03/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### अपघातात मृत्यु

१) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील मौजा आसोला हायवे रोड येथे दिनांक २७/०३/२०२३ चे १९.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– आलोकचंद वसंतराव उईके वय ४७ वर्ष रा. प्लॉट न. सरस्वतीनगर मानेवाडा नागपूर हा यवतमाळ येथून नागपूर येथे आपली मोटरसायकल क्र. एम एच ३१ सीडी. ३३८० वर स्वत: व फिर्यादीचा मित्र डबलसिट जात असता आसोला गावाजवळील हायवे रोडने येत असतांना समोरून येणाऱ्या आरोपी अज्ञात ट्रेलर चालकाने स्वत:चे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निश्काळजीपणे चालवून कट मारल्याने फिर्यादी व त्याचा मित्र गाडीवरून खाली पडले फिर्यादीचा मित्र **मृतक नामे–संजय बुचूंडे** यांच्या अंगावरून ट्रेलरगाडीचे मागचे चाक गेल्याने तो गंभीर जखमी होवून जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ अ भादवी सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. पालीवाल मो. क्र. ९९२१३३७२८८ हे करीत आहे.

२) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील उदासा शिवार एनएच ३५३ डि पुलीया येथे दिनांक २७/०३/२०२३ चे १९.०० वा. ते १९.१५ वा. सुमारास मृतक हा पायदळ रोड क्रॉस करीत असतांना उमरेड कडुन नागपुर कडे जाणारी आरोपीची अज्ञात पांढऱ्या रंगाची कार चालकाने आपल्या ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन **मृतक नामे– राजु अमृत कोहपरे वय ५० वर्ष रा. उदासा ता उरमेड** यास धडक दिल्याने तो जागीच मरण पावला व कार चालक हा कारसह घटनास्थळाहुन पळुन गेला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोना/२०४१ रूपेश महादुले पोस्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. राजु डोर्लीकर मो. नं. ७५८८२३७७६४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर